नवप्रभा
सोमवार दि. १५ डिसेंबर २०१४

# 'निसर्गाच्या प्रत्येक गोष्टीत कविता'

दोडामार्ग (न. प्र.)

कविता ही आपल्या अवती-भवतीच, प्रत्येक गोष्टीत असते; पण ती टिपता आली पाहिजे, तशी नजर आपल्याकडे असायला हवी तरच आपण कविता लिहू शकतो, असे गोमंतकातील सुप्रसिद्ध कवी व आमदार विष्णू सूर्या वाघ यांनी उद्‌गार काढले. लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय दोडामार्गमधील मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे काव्य मैफलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्याप्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्यात मराठी साहित्याविषयी आवड निर्माण व्हावी या हेतूने महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कवितेविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी मराठी, कोकणी व मालवणी 'काव्य मैफल' या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी व कवी म्हणून बोलताना ते पुढे म्हणाले. कविता ही आपल्या जगण्यातून आली पाहिजे. निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीत कविता असते. आपल्या अवती-भवती ती वावरत असते. फक्त तिला पहायला शिकले पाहिजे. सभोवतालच्या वातावरणाशी जुळवून घेतलं तरच कविता होऊ शकते. कविता ही माणसाला जगायला शिकवते, ती जगण्याला अर्थ देते. कवितेतील शब्द कधी हसवतात, रडवतात, कधी अंत:र्मुख करतात, त्यातून जगण्याला एक नवी प्रेरणा मिळते. निसर्गाकडे कविच्या नजरेने पाहिले पाहिजे. यावेळी त्यांनी आपल्या शैलीत विविध कविता सादर करताना उपस्थितांना खळखळून हसायला लावलं तर कधी भावनात्मक कवितांनी रडायला लावले. //